स्थायी समितीच्या **शुक्रवार** दिनांक 23–11–2012 रोजी दुपारी 03–30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. तिवारी दयाशंकर चंन्द्रशेखर | अध्यक्ष |
| 2. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 3. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 4. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 5. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 6. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 7. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 8. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 9. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 10. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 11. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 2. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 3. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 4. | सौ.जैसवाल हर्षला संजय | सदस्या |
| 5. | सौ.अलका अजय दलाल | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. रविन्द्र कुंभारे, अति. उप निगम आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**<u>ठराव क्रमांक 185</u>** :– नागपूर महानगरपालिकेच्या मा. पदाधिकारी, अधिकारी तसेच आवश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना कार्यालयीन कामाकरीता एकमेकांशी संवाद साधन्यासाठी मोबाईल सेवेचे दर निश्चित करण्याकरीता ई–निविदा मागविण्यात आल्या असता मे. भारती एअरटेल लि. यांचे दर निम्नतम असल्यामुळे मे. भारती एअरटेल लि. यांचे निम्नतम दरास 3 वर्षाच्या कालावधीकरीता मोबाईल सेवा पुरविण्यासाठी प्रति वर्ष रु. 40,00,000/– (रुपये चाळीस लक्ष) च्या खर्चास मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 186</u>** :– वार्ड क्र. 42–ब, गोंडपुरा येथे चिटणवीस वाडयाजवळ नाल्याचे बांधकामास्तव एकूण रु. 29,99,461/– रकमेच्या प्राकलनास पद क्र. 618 अंतर्गत प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 187</u>** :– प्रभाग क्र. 40 येथील गांधीबाग उद्यानात विविध स्थापत्य कामे करणे चे प्राकलन रु. 20,82,781/– व उक्त ठिकाणी खेळणी परिसरात इ.पी.डी.एम. रबर फलोरींग करावयाचे कामाचे प्राकलन रु. 24,67,028/– असे एकुण रु. 45,49,809/– चे एकत्रित प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा तसेच या कामास्तव निविदा मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 188</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर